
# प्रेम फाऊंडेशन, नाशिक

## वार्षिक अहवाल -२०२३-२४

समाजाभिमुख काम करीत असतांना प्रेम फाऊंडेशन नाशिक द्वारा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात विविध उपक्रम राबविण्यात आलेत.संस्थेच्या माध्यमातुन समाजाच्या आणि प्रामुख्याने महिलांच्या सामाजिक,आर्थिक व राजकीय सक्षमीकरणासाठी तसेच त्यांच्या क्षमता विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे-

**१) महिलांसाठी सक्षमीकरण कार्यक्रम :-** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील आंबेवाडी,खड्केद,इंदोरे, वासाळी,बारशिंगवे ता.इगतपुरी जि.नाशिक येथील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने उद्योग-व्यवसाय सुरु असलेल्या महिलांचे बाजार,खरेदी-विक्रीमुल्यवर्धन,साठवणूक प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणात उद्योग-व्यवसायाचे प्रकार,उद्योग-व्यवसायाची निवड,व्यवसायासाठी भांडवल उभारणी,बाजार व्यवस्था,कच्च्या मालाची उपलब्धता,कच्चा माल व उत्पादित मालाच्या साठवणुकीची व्यवस्था,विविध परवानग्या,दस्तावेज प्रक्रिया इ.बाबींची सविस्तर माहिती या प्रशिक्षणांच्या माध्यमातून देण्यात आली.सोबतच उपलब्ध मालावर प्रक्रिया करून मालाचे मूल्यवर्धन करणे साठीच्या विविध सूचना करण्यात आल्या.



प्रेम फाउंडेशन
एफ-13525/12 नाशिक
नाशिक

या पाचही गावांमध्ये घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणामध्ये २७० महिलांनी सक्रीय सहभाग घेतला. सदरचे प्रशिक्षणे घेण्यासाठी राजेंद्र कुलकर्णी,राजेंद्र पवार,स्मिता शिंपी,चैताली विसपुते,नितीन सोनवणे,इ. व्यक्तींनी प्रशिक्षक म्हणून काम पहिले.यातून प्रामुख्याने

**अ)** नारी आदिवासी महिला कृषी उत्पादक कंपनीची उभारणी

**आ)** शासनमान्य स्वस्त धान्य दुकान खड्केद आणि आंबेवाडी ता.इगतपुरी जि.नाशिक सुरु झाले.

२) **एच. आय. व्ही संसर्गित व्यक्तींचा वधु-वर परिचय मेळावा :-** एच. आय. व्ही. सह जीवन जगणा-या व्यक्तींना योग्य जोडीदार मिळून त्यांना त्याचा सुखी संसार करता यावा म्हणून सर्व जातीय राज्यस्तरीय एच. आय. व्ही.सह जीवन जगणाऱ्या व्यक्तीचा वधु-वर परिचय मेळावा दि.९ डिसेंबर २०२३ शनिवार रोजी माळी समाज मंगल कार्यालय,द्वारका नाशिक येथे घेण्यात आला.







या मेळाव्यात ३०० हून अधिक वधु-वरांनी सहभाग घेतला तर त्यातील ८ वधु-वरांचा विवाह निश्चीत करण्यात आला. अशा वधु-वर परिचय मेळाव्यामुळे उपवर मुला-मुलींसोबतच जोडीदार गमावलेल्या व्यक्तींनाही एक व्यासपिठ उपलब्ध झाले. परिणामी जगण्याची उमेद वाढीस लागण्यास मदत झाली.या वधु-वर परिचयमेळाव्यात आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी,विविध स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी ,सामाजिक क्षेत्रातील जाणकार व्यक्ती यांनी सक्रीय सहभाग घेतला.

प्रेम फाऊंडेशन
एफ-
13525/12
नाशिक
नाशिक

**३) प्रेमांगण वृद्धाश्रम :-** समाजातील वृद्ध व्यक्तींच्या वाढत्या समस्या लक्षात घेता त्यांना ना नफा ना तोटा या तत्वावर चालत्या फिरत्या व्यक्तींसाठी वृद्धाश्रम सुरु केला आहे.अल्प खर्चात अधिकाधिक वृद्धांची सेवा करून त्यांच्या समस्या सोडवण्यास मदत करता येईल या उद्देशाने "प्रेमांगण" या नावाने फक्त चालत्या फिरत्या वृद्धांसाठी वृद्धाश्रम-हॉलिडे होम सुरु आहे.याचा अनेक वृद्धांनी लाभ घेतलं असून त्यांना सन्मानाने जगण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध करून देता आली याचा आनंद आहे.











त्यानुसार नाशिक शहरातील सुंदरबन कॉलनी परिसरात प्रायोगिक तत्वावर भाड्याची इमारत घेऊनया ठिकाणी सर्व सोयीनी युक्त अशा वृद्धाश्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.भविष्यात जास्तीत-जास्त वृद्धांची कमी खर्चात कशी सोय करता येईल ?याचे संस्था नियोजन करीत आहे.

**४) विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान :-** एखाद्या स्त्री च्या पती निधानंतर समाजातील अनिष्ट रूढी प्रथा,परंपरेनुसार त्या स्त्री च्या कपाळावरील कुंकू पुसणे,हातातील बांगड्या फोडणे,मंगळसूत्र,जोडवे काढून घेणे,या सारख्या बाबी केल्या जातात.राज्यासह,देश आणि जागतिक स्तरावरही अशा अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा पाळल्या जातात.या अनिष्ट प्रथा,परंपरांमुळे महिलेला तिचा आत्मसन्मान गमवावा लागतो.या स्थितीत तिची इच्छा असो वा नसो तिला या अनिष्ट रूढी प्रथा परंपरा यांचे पालन करावेच लागते.एवढ्यावरच हे दृष्ट चक्र थांबत नाही तर पती निधनानंतर त्यात

प्रेम फाऊंडेशन
एफ-13525/12
नाशिक

तिचा काहीही दोष नसतांना पुढील आयुष्य विधवा म्हणुन आणि एक अशुभ व्यक्ती म्हणुन अपमानास्पद स्थितीत जगावे लागते.हे योग्य नाही.म्हणुन अशा प्रकारच्या अनिष्ट रूढी,प्रथा,परंपरा कायमस्वरूपी बंद व्हाव्यात.व त्या साठी कायदा करावा म्हणुन विधवा महिला सन्मान व संरक्षण अभियान सुरु करण्यात आले आहे.













या अभियानाची व्याप्ती राज्यभर झाली या पुढे हे अभियान देश पातळीवर नेवुन केंद्रीय कायदा व व्यवस्था कशी निर्माण करता येईल या साठी ह्या वर्षी जागतिक विधवा महिला दिनाच्या औचित्यावर गांधी शांती प्रतिष्ठान, नवी दिल्ली येथे राष्ट्रीय विमर्श परिषद घेण्यात आली.यात देशपातळीवरील अनेक प्रतिनिधींनी सक्रीय सहभाग घेतला.

**५) राज्यस्तरीय सर्व जातीय अंध,अपंग,विधवा,विधुर,मुकबधिर व्यक्तींचा वधू-वर परिचय मेळावा :-** श्रीग्रुप फौंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विध्यमाने राज्यस्तरीय सर्व जातीय विधवा विधुर मुकबधिर अंध अपंग व्यक्तींचा १० वा वधू-वर परिचय मेळावा श्री.रावसाहेब थोरात सभागृह,नाशिक येथे घेण्यात आला.या मेळाव्यात १००० हून अधिक वधू-वर यांनी सहभाग घेतला यातून १५० हून अधिक विवाहांची प्राथमिक जुळणी झाली असून या वधू-वर परिचय मेळाव्यामुळे दुर्लक्षित वंचित व गरजू व्यक्तींना व्यासपीठ उपलब्ध झाले.

प्रेम फाऊंडेशन एफ-13525/12 नाशिक









या व अशा प्रकारच्या विविध उपक्रमाचे आयोजन 'या आर्थिक वर्षात करण्यात आले. या कार्याच्या यशस्वीतेसाठी इंडिगो एअर लाईन्स दिल्ली, अफार्म संस्था पुणे,एन. जी. ओ. फोरम नाशिक, गोदावरी कन्सल्टन्सी नाशिक. या सोबतच विविध सहाय्यकारी संस्था, शासनाचे विविध विभाग, देणगीदार व हितचिंतकांसोबतच संस्थेचा कर्मचारी वर्ग आणि लाभार्थी घटक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. असेच सहकार्य भविष्यातही लाभो.संस्था या सर्वांची सदैव ऋणी आहे.

प्रेम फाऊंडेशन एफ-13525/12 नाशिक

**अध्यक्ष**
प्रेम फाऊंडेशन
नाशिक